(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

[२०२२] १६ एस. सी. आर ३२२

हॉटेल प्रिया, मालकी संस्था

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य आणि इतर

(दिवाणी अपील क्र. १४५९/२०२२)

फेब्रुवरी १८,२०२२

**[न्या. के. एम. जोसेफ आणि न्या. एस. रवींद्र भट]**

*कॅबरे कार्यक्रम, मेळे आणि तमाशा नियम, १९६० सह सार्वजनिक मनोरंजनकरीता परवाना आणि कार्यक्रम - नियम १०८, १०९ , १२०,१२२ आणि १२३ - भारताचे संविधान - अनुछेद १५ (१) १९ (१) (जी) - इतर गोष्टींबरोबर आक्षेपित अटीं ज्या परवानाधारीत बार वर लादण्यात आल्या जसे की स्त्री/पुरुष लिंग संख्या निर्बंध, किती पुरुष किंवा स्त्रिया ऑर्केस्ट्रा (वाद्यवृंद) किंवा बॅडस मध्ये' सादरीकरण करतील - ला आव्हान - उच्च न्यायालयाने अटी कायम केल्या - आपिलावर निर्णय देण्यात आला की : आक्षेपित स्त्री/पुरुष लिंग संख्या निर्बंध हा साचेबंद दृष्टिकोनाचा परिणाम आहे की आपीलार्थीन साररव्या स्त्रिया ज्या बार्स आणि आस्थपनेत काम करतात त्या समाजाच्या विशिष्ट वर्गातील असतात – स्त्रियांच्या संरक्षणाचा दावा करणारे असे उपाय वास्तविक **अनुच्छेद** १५ चा विनाशक करणारी आहे - हे निर्बंध थेट*

***अनुच्छेद*** *१५ (१) आणि* ***अनुच्छेद*** *१९ (१) (जी) चे उल्लंघन करतात - नंतरची तरतुद कलाकार तसेच परवाना धारक दोघांवर परिणाम करते -स्त्री किंवा पुरुष लिंग संख्या जे वाद्यवृंद किंवा बॅडस आणि १९६० च्या नियम आणि इतर संबंधित तरतुदी खाली परवाना'दिलेले बार्स मध्ये सादरीकरण करू शकतात त्यावर मर्यादा घालते, निरर्थक आहे - तथापि कलाकारांच्या एकूण संख्येवरच विनियमन, किंवा स्टेजचे परिमाण (ज्यावर कार्यक्रम होऊ शकतो) निर्बंध म्हणून दर्शविले जाऊ शकत नाही, ते अशा अटी तयार करणाऱ्या आयुक्तांच्या किंवा सरकारच्या कायदेशीर क्षेत्रामध्ये येऊ शकतात - अशाप्रकारे कुठल्याही दिलेल्या कार्यक्रमात कलाकारांची एकूण मर्यादा आठ पेक्षा जास्त असू शकत नाही, रचना (म्हणजे सर्व महिला, बहुसंख्य महिला व पुरुष, किंवा उलट ) कुठल्याही संयोगाचे असू शकतात - आक्षेपित न्यायनिर्णय रद्द करण्यात येतो - महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ - कलमे २(९), २(१०), ३३(१), ३३(२), १६२(१) & १६२ (२).*

**अपील मान्य करताना न्यायालयाने खालील निर्णय दिला -**

**१.१ महिलांच्या कल्याणाला चालना देण्यासाठी, महिलांची मानवी तस्करी आणि त्यांचे शोषण रोखण्यासाठी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने निर्बंध आवश्यक आहेत, आणि सार्वजनिक नैतिकतेच्या दृष्टीने निर्बंध आवश्यक आहेत, खूप जीर्ण झालेले आहेत आणि निर्णायकपणे नाकारले गेले आहेत. असा युक्तिवाद सध्याच्या प्रकरणात मांडण्यात आला. त्याच नाकारण्यात आलेल्या सादर निवेदनांची पुनरावृत्ती करण्याखेरीज वैयक्तिक ऑर्केस्ट्रा किंवा बँडकरीता लिंग-मर्यादा कशी नियामक आहे, हे राज्य सरकारने स्वतंत्रपणे सिद्ध केलेले नाही. या न्यायालयाच्या**

**दिनांक ०२.०३.२०१६ च्या (रिट याचिका (सी) क्र. ७९३/२०१४ ) मधील आदेशात असे नोंद करण्यात आले होते की. या अटीं रेस्टॉरंट आणि परमिट रूम क्षेत्र यांच्यात अपारदर्शक विभाजन असलेल्या एफ.एल.-३ साठी उत्पादन शुल्क विभागाच्या मंजूर आराखड्यानुसार स्टेजचा आकार (जेथे कार्यक्रम होणार होते ) १० फूट बाय १२ फूट आकाराच्या क्षेत्रापर्यंत मर्यादित ठेऊ शकतील. कलाकारांच्या संख्येची मर्यादा चार असेल, अशी माहिती न्यायालयाला देण्यात आली. तर कलाकारांच्या एकूण संख्येची मर्यादा, जी सध्याच्या प्रकरणात आठ आहे ती अवाजवी मानता येणार नाही, कारण जागेमद्धे (१२० चौरस फूट) वादकांचाही समावेश असेल, त्या आदेशात कलाकारांसाठी किंवा बँडसाठी लिंग-मर्यादेचा विचार करण्याची कोणतीही संधी नव्हती. [परि. ३९, ४०] [३४४-सी-एफ]**

महाराष्ट्र राज्य आणि अन्य वि. इंडियन हॉटेल आणि रेस्टोरंट असोसिएशन आणि इतर (आयएचआरए१) **(२०१३) ८ एससीसी ५१९ : [२०१३] ७ एससीआर ६५४** ; इंडियन हॉटेल आणि रेस्टोरंट असोसिएशन वि. महाराष्ट्र राज्य (आयएचआरए-२) **(२०१५) १६ एससीसी १००** ; रेस्टोरंट असोसिएशन आणि अन्य वि. महाराष्ट्र राज्य आणि इतर (आयएचआरए-३) **(२०१९) ३ एससीसी ४२९ : [२०१९] १ एससीआर ३७१** - ला संदर्भित

१.२ आक्षेपित लिंग-मर्यादा (म्हणजे चार स्त्रिया आणि चार पुरुष, कोणत्याही सादरीकरणामध्ये) अपीलकर्त्यांप्रमाणेच बार आणि आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या स्त्रिया

समाजातील एका विशिष्ट वर्गातील असतात या रुढीवादी दृष्टिकोनाची उपज असल्याचे दिसते. या न्यायालयाच्या मते, महिलांच्या संरक्षणाचा दावा करताना हे निर्बंध कायम ठेवण्यासाठी उत्तरवादींनी दिलेले औचित्य, त्यांच्या आकांक्षाना छेद देण्याच्या आरोपासाठी खुले आहे. जर महिलांच्या सुरक्षिततेची खरी चिंता असेल तर, अनुज गर्ग यांनी अधोरेखित केल्याप्रमाणे, त्यांच्या कामासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे - त्याला विरोध करण्याऐवजी आणि त्यांच्या निवड दाबून टाकण्या ऐवजी त्यांच्या रोजगाराच्या सोयीसाठी ते अतिरिक्त मैल चालवणे, . संरक्षणाचा दावा करणारे असे उपाय प्रत्यक्षात कलम १५ (३) चे विध्वंसक आहेत कारण ते विशेष तरतुदींचा आव आणतात आणि स्त्रियांच्या त्यांच्या व्यवसायाच्या निवडीवर मर्यादा आणण्यासाठी किंवा वगळण्यासाठी कार्य करतात. [परि. ४२, ४६] [३४५-ए : ३४७-इ -जी]

अनुज गर्ग आणि इतर वि. हॉटेल असोसिएशन ऑफ इंडिया आणि इतर

**(२००८) ३ एससीसी १ : [२००७] १२ एससीआर ९९१** - वर भिस्त ठेवली.

**१.३ सध्याच्या प्रकरणात, कलाकारांच्या एकूण संख्येवरील विनियमन, किंवा एखाद्या स्टेजच्या परिमाणांवर (ज्यावर सादरीकरण होऊ शकते) निर्बंध म्हणून दर्शविले जाऊ शकत नाही; ते अशा अटी तयार करणाऱ्या आयुक्तांच्या किंवा सरकारच्या कायदेशीर क्षेत्रात येऊ शकतात. हे निर्बंध लिंगावर आहेत, असा या न्यायालयाचा अनुमान आणि निष्कर्ष लक्षात घेता, लिंगाच्या आधारे कलाकारांची संख्या मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. हे निर्बंध *अनुच्छेद* १५ (१) आणि *अनुच्छेद* १९ (१) (जी) चे उल्लंघन करतात. नंतरच्या तरतुदींनचा परिणाम कलाकार**

आणि परवानाधारक मालक दोघांनाही होतो. हे निष्कर्ष लक्षात घेता लादलेली आणि अमलात न आणता येणारी आणि रद्दबातल ठरवलेली अट 'कायदा' आहे का, या प्रश्नाचे उत्तर देणे अनावश्यक आहे, असे या न्यायालयाचे मत आहे. या न्यायालयाच्या प्राधिकाऱ्यांनी वारंवार सांगितल्याप्रमाणे, जेव्हा जेव्हा आव्हाने उद्भवतात, विशेषत: लिंगाच्यावर आधारालेली असतात, तेव्हा जर आणि किती प्रमाणात संबंधित प्रथा किंवा नियम किंवा निकष ऐतिहासिक पूर्वग्रह, लैंगिक रूढी आणि पितृत्वात रुजलेले आहेत याचे बारकाईने तपासणी करणे न्यायाधीशांचे काम आहे. अशा प्रवृत्तींना आपल्या समाजात स्थान नाही; सशस्त्र दलातील रोजगारासारख्या पुरुषांचा एकमेव 'बालेकिल्ला' समजला जाणारा भाग आता तसा राहिलेला नाही, हे अलीकडच्या घडामोडींवरून अधोरेखित झाले आहे. त्याचप्रमाणे सध्याच्या प्रकरणातही हे न्यायालय आक्षेपित अटीने लादलेली लिंगमर्यादा अमान्य असल्याचे मत व्यक्त केले आहे. अशी आशा करता येईन की, प्रस्तुत न्यायनिर्णयाने या न्यायालयाच्या आधीच्या निकालांमुळे बराच काळ गप्प बसलेल्या झंझावाताची रेंगाळलेली आणि विसंगत टिपणी सध्याचा निकाल अजूनही कायम राहील, अशी आशा आहे. आक्षेपीत निर्णय रद्दबातल करण्यात येत आहे. नियम, १९६० आणि इतर संलग्न तरतुदींनुसार परवाना प्राप्त बारमध्ये

वाद्यवृंद आणि बँडमध्ये सादरीकरण करू शकणाऱ्या महिला किंवा पुरुषांच्या संख्येबाबत लिंगमर्यादा घालण्याची अट अवैध असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. कोणत्याही सादरीकरणातील कलाकारांची एकंदर मर्यादा आठपेक्षा जास्त असू शकत नसली तरी रचना (म्हणजे सर्व स्त्रीया, बहुसंख्य स्त्री किंवा पुरुष, किंवा याउलट) कोणत्याही संयोगाची असू शकते.

**अपील मान्य करण्यात येत आहे, परंतु खर्चाबाबत कोणताही आदेश नाही. [परि. ४७-४९]**

**[३४७ -एच; ३४८-ए-एफ]**

जोसेफ शाइन वि. भारत सरकार **(२०१९) ३ एससीसी ३९ : [२०१८] ११ एससीआर ७६५ - अनुसरण केले.**

कर्नाटक लायव्ह बॅड रेस्टोरंटस असोसिएशन वि. कर्नाटक राज्य **(२०१८) ४ एससीसी ३७२ : [२०१८] १ एससीआर ५३३ - उल्लेखनीय.**

सी. बी. मूथम्मा वि. भारत सरकार (१९७९) ४ एससीसी २६० : [१९८०] एससीआर ६६८ - वर **भिस्त ठेवली.**

बिजोइ इम्माणूएल आणि इतर वि. केरळ राज्य आणि इतर **(१९८६) ३ एससीसी ६१५ : [१९८६]**

**३ एससीआर ५१८** ; भारत सरकार वि. नवीन जिंदाल **(२००४) २ एससीसी ५१० : [२००४] २ एससीसी ५१० : [२००४] १ एससीआर १०३८** ; पंजाब राज्य वि. देवांस मॉडर्न ब्रेवीरीज लि. आणि अन्य **(२००४) ११ एससीसी २६ : [२००३] ५ पुर. एससीआर ९३०** - ला संदर्भित

**<u>निर्णय विधी संदर्भ</u>**

| | | |
|---|---|---|
| **[२०१३] ७ एससीआर ६५४** | **संदर्भित** | **परि.३२** |
| **[२०१९] १ एससीआर ३७१** | **संदर्भित** | **परि.३४, ३५ & ३७** |
| **[२००७] १२ एससीआर ९९१** | **भिस्त ठेवली** | **परि. ४३ आणि ४६** |
| **[१९८०] १ एससीआर ६६८** | **भिस्त ठेवली** | **परि. ४३ आणि ४६** |
| **[२०१८] ११ एससीआर ७६५** | **अनुसरण केले** | **परि. ४४** |
| **[१९८६] ३ एससीआर ५१८** | **संदर्भित** | **परि. ३७** |
| **[२००४] १ एससीआर १०३८** | **संदर्भित** | **परि. ३७** |
| **[२००३] ५ पुर. एससीआर ९३०** | **संदर्भित** | **परि. ३४** |
| **[२०१८] १ एससीआर ५३३** | **उल्लेखनीय** | **परि. ४१** |

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्र. १४५९/२०२२

रिट याचिका क्र. ७९६२/२०१० मधील मुंबई उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय आणि आदेश दि . ०६/०५/२०११ वरुन.

सह

२०२२ चे दिवाणी अपील क्र. १४६० आणि १४६१ .

प्रसेनजीत केसवाणी, सत्यजित सहा, उपमन्यू तेवारी, श्रीमती व्ही. डी. खन्ना, मनोज के. मिश्रा, उमेश दुबे, प्रतीक सोम, आलोक पांडे, डॉ. भीम प्रताप सिंग, आपिलकर्त्यांकरता वकील.

सचिन पाटील, राहुल चिटणीस, आदित्य ए. पांडे, जिओ जोसेफ, विवेकानंद सिंग, उत्तरवादींनकरीता वकील.

**न्या. एस. रवींद्र भट** यांनी हा न्यायालयाचा न्यायनिर्णय दिला होता.

१. परवानगी मंजूर केली. **प्रस्तूत आपिले** १२.०९.२००९ च्या आदेशान्वये लादलेल्या अटी कायम ठेवणाऱ्या **मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयातून (आणि नंतर अनुसरण केलेल्या आदेशातून)**[1] उद्भवली आहेत.

***तथ्यांचा सारांश***

२. अपीलकर्ते एकतर मालक आहेत किंवा आवश्यक परवाने /परवानग्या असलेले रेस्टॉरंट आणि बार चालवत आहेत. वाद्यवृंद कार्यक्रम हे त्यांच्या आवारात एक सामान्य वैशिष्ट्य आहे. त्यामुळे ते *'ऑर्केस्ट्रा बार'* या नावाने जातात. या वैशिष्ट्यासाठी, त्यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ (यापुढे "अधिनियम, १९५१") अन्वये तयार करण्यात आलेले कॅबरे कार्यक्रम, मेळे आणि तमाशा नियम, १९६० (यापुढे "नियम, १९६०") सह सार्वजनिक मनोरंजनकरीता परवाना आणि कार्यक्रम - अंतर्गत जागा आणि कार्यक्रम परवाने मिळवणे आवश्यक आहे. बृहन्मुंबई पोलीस आयुक्तांनी अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१) (डब्ल्यू) (१) आणि (डब्ल्यू) (२), कलम १६२ (१) सह नियम १९६० च्या नियम १०८ अ, १०९, ११८, २०७ आणि २०९ अन्वये अधिकारांचा वापर करून जागा परवान्यात नमूद केलेल्या विद्यमान अटींव्यतिरिक्त १२.०९.२००९ च्या आदेशाद्वारे अनेक अटी समाविष्ट केल्या. याचिकाकर्त्यांनी रिट याचिका क्र.

1 रिट याचिका क्रमांक ७९६२/२०१० मध्ये आणि संबंधित प्रकरणात दिनांक ६ मे २०११ तसेच रिट याचिका क्रमांक २८८३/२०१२ मधील दिनांक १९/१२/२०१२ चा न्यायनिर्णय आणि आदेश ज्यात दिनांक ६ मे २०१२ च्या न्यायनिर्णयाचे अनुसरण केले होते.

७९६२/२०१० व संबंधित प्रकरणांमध्ये काही अटींना आव्हान दिले होते. तथापि, सुनावणीच्या टप्प्यावर, आव्हान खालील अटींपुरते मर्यादित होते:

(१) परवानाधारकाला केवळ चार महिला गायक/ कलाकार आणि चार पुरुष गायक/ कलाकार परवानगी दिलेल्या रंगमंचावर (स्टेजवर) उपस्थित राहण्याची मुभा आहे.

(२)परवानगी दिलेल्या रंगमंचावर केवळ आठ कलाकारांना (चार पुरुष आणि चार महिला) उपस्थित राहण्याची परवानगी आहे.

३. उच्च न्यायालयासमोर याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला होता की, कलाकारांच्या विशिष्ट संख्येचे अभिनिर्धारण किंवा कलाकारांच्या संख्येवर कोणतेही निर्बंध लादणे, मग ते पुरुष असो किंवा महिला, याला अधिनियम, १९५१ किंवा नियम, १९६० मध्ये कोणताही आधार नाही आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४ आणि अनुच्छेद १९ (१) (जी) चे उल्लंघन करते.

४. उच्च न्यायालयाने, आयुक्तांनी घातलेल्या अटीं, ह्या त्यांना घालण्याचा अधिकार अधिनियम १९५१ मधील तरतुदी आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांमध्ये असल्याचे मान्य करून अटींना दिलेल आव्हान परतवून दिले. (रद्द केले) पुढे असेही मान्य करण्यात आले की, आयुक्तांना ऑर्केस्ट्रा बार्स चालविण्यासाठी आवश्यक त्या अटी निर्गमित करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्यामुळे आयुक्तांनी अशा अटी लादण्याचे कार्य त्यांच्या शक्ति (अधिकार) अंतर्गत केले आहे, असे मान्य करून उच्च न्यायालयाने रिट याचिका फेटाळून लावली.

***पक्षकारांचे सादर निवेदन***

५. अपीलकर्त्यांचे विद्वान वकील श्री. प्रसेनजीत केसवानी आणि श्री. मनोज के. मिश्रा यांनी सादर निवेदन केले की, आस्थापनांना केवळ आठ कलाकार आणि पुढे असे की काटेकोरपणे चार पुरुष आणि चार महिला कलाकारांना सहभाग असण्याच्या निर्बंधित आक्षेपित अटी, घटनेच्या *अनुच्छेद* १४ आणि *अनुच्छेद* १९ (१) (जी) चे उल्लंघन करणाऱ्या आहेत. वकिलांनी पुढे असा युक्तिवाद केला की, संख्येवर असलेले निर्बंध त्यासह पुढे संगीत (ऑर्केस्ट्रा) सादरीकरण करणारे कलाकारांच्या (स्त्री/पुरुष) लिंगावर असलेले संयुक्तिक निर्बंध हे कलाकारांच्या हक्कावरही निर्बंध आहेत तसेच आयोजकांच्या म्हणजे बार किंवा मनोरंजनाच्या स्थळाच्या मालकाच्या अधिकारावर निर्बंध आहे. जर सर्व पुरुष बँड ऑर्केस्ट्रा किंवा सर्व-महिला बँड किंवा ऑर्केस्ट्रा असतील किंवा त्यापैकी कोणतेही वेगळे क्रमपरिवर्तन असल्यास, या संख्यात्मक निर्बंधाचा परिणाम अशा बँडच्या सहभागावर पूर्णपणे प्रतिबंध होण्यावर होईल. हे पूर्णपणे अवाजवी असेल आणि कलम १९ (१)(जी) चे उल्लंघन ठरेल. असे निर्देशनास आणून देण्यात येते की, *अनुच्छेद* १९ (६) अन्वये कोणत्याही वाजवी निर्बंधांच्या वाक्खंडा पैकी कोणतेही वाक्खंड अशी अट वाचविण्यासाठी आकर्षित केले जाणार नाहीत.

६. अपीलकर्त्यांनी असे सादर निवेदन केले की, या अटींना साध्य करू इच्छित कथित उद्दीष्टाशी कोणताही तर्काधार नाही. ऑर्केस्ट्रा किंवा सिंगल बँड सादरीकरणा सारख्या कलात्मक सादरीकरणात कलाकारांची संख्या आणि लिंग यासंदर्भात वेगवेगळे क्रमपरिवर्तन आणि संयोजन असू शकते याकडे लक्ष वेधले जाते. कलाकारांची रचना, पूर्णपणे बँड किंवा समूह आपला व्यवसाय कसा आयोजित करू इच्छितो यावर अवलंबून असते. हे काय वाजवले जाते, ते किती

लोकप्रिय किंवा चांगले स्वीकारले जाते आणि कोणत्या कलाकाराची लोकप्रियता आहे यावर अवलंबून असेल. ऑर्केस्ट्रा बँडमध्ये समान लिंग सहभागाची कठोर आणि ताठर संख्यात्मक विभागणी, कोणताही तर्कसंगत आधार देत नाही. वकिलांनी असा युक्तिवाद केला की दिलेल्या परिस्थितीत, एखादी बाब किंवा तुकडा सर्व पुरुष कलाकार किंवा सर्व स्त्रिया किंवा काही पुरुष आणि बहुसंख्य स्त्रिया किंवा याउलट सामील असू शकतो. तृतीयपंथी व्यक्तींचाही यात सहभाग असू शकतो. कोणत्याही वेळी रंगमंचावरील आठ कलाकारांची एकंदर मर्यादा रास्त आहे, यात दुमत नसले तरी कोणत्याही लिंगाच्या कलाकारांच्या संख्येवर मर्यादा घालणारा आग्रह अवाजवी आणि स्पष्टपणे मनमानी आहे.

७. ऑर्केस्ट्रासाठीच्या (सांगीतिक कार्यक्रम / वाद्यवृंद / कलापथक ) कार्यक्रमाच्या परवान्यांच्या अटींनुसार कलाकारांची संख्या किंवा लिंग यावर निर्बंध घालणे घातक आहे, असा आग्रह वकिलांनी धरला. याचिकाकर्त्यांनी या न्यायालयाच्या महाराष्ट्र राज्य आणि दुसरा वि. इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन आणि इतर २[2] (पुढे ("आय एच आर ए - आय") तसेच इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन आणि इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर (यानंतर "आय एच आर ए - ३")[3], या न्यायनिर्णयांचा दाखल दिला आहे आणि विनंती केली आहे की या न्यायालयाने त्या निर्णयांमध्ये सार्वजनिक नैतिकतेचा ( डान्सबारवर बंदी ) युक्तिवाद फेटाळून लावताना असा निर्णय दिला की "बारमध्ये ( बार म्हणजे मदिरालय किंवा मद्यपान सेवा पुरवणारे गृह ) नृत्य करणे हे अतिरिक्त वाणिज्यक / व्यावसायिक मानले जाऊ शकत नाही."

2 (२०१३) ८ एससीसी ५१९
3 (२०१९) ३ एससीसी ४२९

८. अपीलकर्ते सादर करतात की कलम ३३ ( १ ) (डब्ल्यू), (डब्ल्यू ए) (१) आणि (डब्ल्यू ए) (२) अंतर्गत पोलिस आयुक्तांना सार्वजनिक मनोरंजन किंवा करमणुकीच्या ठिकाणांना परवाना देण्यासाठी किंवा नियंत्रण राखण्यासाठी नियम बनविण्याचा आणि सार्वजनिक सुव्यवस्था, शालीनता किंवा नैतिकतेच्या हितासाठी किंवा सामान्य जनतेच्या हितासाठी, सार्वजनिक मनोरंजनामधे संगीत, नृत्य, मिमिक्री किंवा इतर कोणतेही सादरीकरण करण्यासंदर्भात परवाना किंवा त्याच्या नियंत्रणाशी संबंधित बाबींसंदर्भात, नियम तयार करण्याचा अधिकार आहे. सार्वजनिक सुव्यवस्था, शालीनता किंवा नैतिकतेच्या हितासाठी किंवा सर्वसामान्यांच्या हितासाठी अशा सादरीकरणात कलाकारांची नेमणूक आणि कलाकार आणि प्रेक्षकांच्या वर्तनाचे नियमन करण्यासाठी नियम बनविण्याचे अधिकारही या तरतुदींमध्ये आहेत. आयुक्तांच्या अधिकारांना आव्हान नाही. मात्र, त्या तरतुदी वाचल्यावर परवाना आणि नियंत्रण केवळ नियम किंवा आदेशाद्वारेच होऊ शकते, हे स्पष्ट होते असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. आयुक्तांना अधिकार असले तरी कलम ३३ (२) (ii ) आणि कलम ३३ (६) अन्वये अधिकार वापरावे लागतात. कलम ३३ (२) (ii) अन्वये उपकलम १ च्या कलमांतर्गत नियम बनविण्याचा, त्यात बदल करण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार [खंड (अ) व (क) वगळता] त्या - त्या सरकारच्या पूर्वपरवानगीच्या अधीन आहे; आणि कलम ३३ (६) अन्वये नियमातील बदलाचे प्रकाशन हे अगाऊ होणे बंधनकारक आहे. म्हणून, परवाना आणि नियंत्रण केवळ नियमांद्वारे साध्य केले जाऊ शकते आणि ते कार्यकारी सूचना / निर्णयांद्वारे साध्य केले जाऊ शकत नाही.

९. आयुक्तांचे अधिकार, अधिनियम १९६० च्या नियम १०८, १०८ अ, १०९, ११८, १२०, १२१, १२२, फॉर्म - डी आणि फॉर्म - ई द्वारे नियंत्रित केले जातात, असा युक्तिवाद केला जातो. याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद असा आहे की नियम १९६० च्या नियम १०८ - ए मध्ये ऑर्केस्ट्राच्या ( सांगीतिक कार्यक्रम/ वाद्यवृंद / कलापथक ) कार्यक्रमामध्ये आस्थापनांद्वारे नियुक्त केल्या जाऊ शकणाऱ्या कलाकारांच्या संख्येवर किंवा अशा कलाकारांच्या लिंगावर निर्बंध समाविष्ट नाहीत. तसेच कलम १०८ अ, १२० आणि १२२ अन्वये परवाना देण्याच्या अटींमध्ये महिलांचा सन्मान, सार्वजनिक सुव्यवस्था आणि सार्वजनिक नैतिकतेचे रक्षण करण्यासाठी सार्वजनिक हिताचे निकष यापूर्वीच लागू करण्यात आले आहेत. आय एच आर ए - १ मधील नियमांचा विचार करताना या न्यायालयाने म्हटले की, महिलांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी ही वैधानिक व्यवस्था पुरेशी आहे. (परिच्छेद १२७ , १२८ , १२९ , १३० , १३१` , १३२). असेही प्रतिपादन करण्यात आले की कायद्याच्या कलम १६२ मध्ये आयुक्तांना कोणत्याही अटी घालण्याचा अधिकार नाही, केवळ दिलेल्या परवान्यामध्ये कोणत्या अटी व निर्बंधांच्या अधीन राहून परवाना देण्यात आला आहे, हे नमूद केले जावे.

१०. नियम १०९ संधर्भात चर्चा करताना अपीलकर्ते यांचे प्रतिपादन असे आहे की, जर परवाना प्राधिकरणाला असा अर्थ लावण्याची परवानगी दिली गेली की, नियम १०९ आयुक्तांना तिच्या किंवा त्याच्या विवेकाचा वापर करून कोणत्याही प्रकारची अट लादण्याचा अधिकार दिला तर अशा अधिकाराला अतिरेकी अधिकार बहाल केले असेच म्हणता येईल. सदर नियम, अनुच्छेद १९ (१) (अ) आणि १९ (१) (जी) अन्वये देण्यात आलेल्या मूलभूत अधिकारांवर गदा

आणू शकत नाही, कारण या नियमांतर्गत लादलेल्या अटी ह्या कार्यकारी सूचनाच असून त्या अनुच्छेद १३ (३) (अ) च्या अर्थांतर्गत आणि अनुच्छेद १९ (६) च्या उद्देशाने कायदा नसल्यामुळे, मूलभूत अधिकारांच्या उपभोगावर मर्यादा आणू शकत नाहीत. बिजो इमॅन्युएल आणि इतर वि. केरळ राज्य आणि इतर[4] तसेच भारत सरकार विरुद्ध नवीन जिंदाल[5] यामधील, या न्यायालयाच्या निर्णयावर भिस्त ठेवण्यात आली आहे. त्यामुळे कलाकारांची संख्या आणि त्यांच्या लिंगावर निर्बंध घालण्याला कायद्यात कोणताही आधार नाही.

११. संख्यात्मक निर्बंध लादणे सर्वसामान्यांच्या हिताचे आहे, कारण ते सार्वजनिक नैतिकतेच्या व्यापक हिताचे आहे आणि महिलांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या कामाची परिस्थिती सुधारणे ज्यायोगे ऑर्केस्ट्रा बार त्यांच्या परिस्थितीचा गैरफायदा घेऊ नयेत आणि महिला कलाकार आणि वेट्रेसचे (महिला वाढपी) शोषण करू नयेत हे सर्व असे न्याय्य ठरविण्यासाठी राज्याने मांडलेल्या युक्तिवादाचे अपीलकर्त्यांनी खंडन केले आणि पुढे याचिकाकर्त्यांचे म्हणणे असे आहे की या युक्तिवादाला प्रत्यक्षात कोणताही आधार नाही. ते उच्च न्यायालयाने मान्य केले असले, तरी आय एच आर ए - १ मधील या न्यायालयाच्या निर्णयामुळे तो युक्तिवाद आता ग्राह्य धरला जात नाही. आय एच आर ए - १ मध्ये १९५१ च्या कायद्याच्या कलम ३३ अ आणि ३३ ब नुसार मद्यसेवा पुरवणाऱ्या बारमध्ये नृत्याच्या सादरीकरणावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली होती, परंतु क्लब आणि तीन तारांकित हॉटेल्स आणि उच्च आस्थापनांमध्ये त्यांना परवानगी देण्यात आली होती. अशा तरतुदी भेदभावपूर्ण आहेत आणि त्यामुळे कलम १४

4 (१९८६) ३ एससीसी ६१५
5 (२००४) २ एससीसी ५१०

चे उल्लंघन होते आणि मदिरालयामध्ये नृत्यावर संपूर्ण बंदी राज्यघटनेच्या १९ (६) अन्वये वाजवी निर्बंध म्हणून योग्य नाही असे मत न्यायालयाने नोंदवले. सध्याच्या प्रकरणातही हाच तर्क लागू होईल कारण कलाकारांच्या संख्येवरील निर्बंधामुळे अनेक कलाकाराना यामध्ये वगळले जाते अन्यथा त्यांना बँड / कलापथकामध्ये सामील होण्याचा अधिकार असू शकतो. यात कलाकारांच्या व्यवसायिकतेचे आणि एकूणच या व्यवसायाचे नियमन केले जाईल आणि त्या अर्थाने महाराष्ट्रातील सर्व बारमधील कलापथकामध्ये कोणत्याही लिंगाचे ठराविक कलाकार नसतील याच्या चिंतेमुळे त्यांना अवाजवी बोजा सहन करावा लागेल. म्हणूनच, कलाकारांची संख्या एका विशिष्ट लिंगापुरती मर्यादित ठेवणे याला तर्कसंगत आधार नसल्याने ते अतिरेक आणि अवाजवी आहे.

१२. सार्वजनिक नैतिकतेच्या रक्षणाच्या दृष्टीने निर्बंध आवश्यक आहेत, या राज्याच्या युक्तिवादाला सामोरे जाताना असे निदर्शनास आणून देण्यात आले की, तेच निर्णय या पैलूशी मोठ्या प्रमाणात निगडित आहेत. शिवाय काळाच्या ओघात समाजातील नैतिकतेचे निकष बदलतात, त्यामुळे एकेकाळी अनैतिक समजली जाणारी एखादी विशिष्ट कृती, कालावधी लोटल्यानंतर पूर्वीप्रमाणेच (अनैतिक) राहत नाही. न्यायालय नृत्य सादरीकरणाचा विचार करत होते आणि असे म्हटले होते की नृत्याचे प्रतिष्ठेचे प्रकार सामाजिकदृष्ट्या स्वीकारार्ह आहेत आणि कोणीही त्याला अपवादात्मक समजणार नाही. सामाजिक निकषांनी अनैतिक नसणारी प्रथा, राज्य स्वत:च्या नैतिकतेच्या कल्पनेने समाजावर अनैतिक म्हणून लादू शकत नाही आणि त्याद्वारे राज्य सामाजिक नियंत्रण ठेवू शकत नाही, या निरीक्षणांवर भिस्त आहे. शिवाय अशा प्रकारच्या

कोणत्याही कायद्याला घटनात्मक तरतुदीचे निकष सांभाळून त्याला न्यायालयाची सुद्धा मान्यता लागते. म्हणूनच असा युक्तिवाद केला जातो की आव्हान केलेल्या अटींच्या द्वारे लादलेले निर्बंध निषिद्ध क्रियाकलाप रोखण्याचा प्रयत्न करतात आणि सार्वजनिक नैतिकतेस ते हानिकारक आहे, या कारणास्तव ते न्याय्य ठरू शकत नाही.

१३. हॉटेल, रेस्टॉरंट्स आणि बार रूममध्ये अश्लील नृत्य करण्यास प्रतिबंध आणि महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण (त्यामध्ये काम करणारे) अधिनियम, २०१६ ( २०१६ चा अधिनियम ) रद्द बातल ठरवणाऱ्या आय एच आर ए - ३ मधील निकालावर विद्वान वकिलांनी मोठ्या प्रमाणात भिस्त ठेवली. सुबोध भिन्नतेच्या आधारे त्या तरतुदींचे समर्थन करण्याचा राज्य सरकारचा युक्तिवाद आणि अशा आस्थापनांमध्ये सादरीकरण करणाऱ्या स्त्रिया या वंचित समाजातील असतात आणि त्या स्त्रिया मानवी तस्करी याला बळी पडतात किंवा त्यांना बारमध्ये नृत्य करण्यास भाग पाडले जाते आणि तशी त्यांची इच्छा नसते हा युक्तिवाद अन्यायकारक असल्याचे वकिलांनी निदर्शनास आणून दिले. त्याचप्रमाणे सध्याच्या खटल्यात घालण्यात आलेले निर्बंध कोणत्याही प्रकारे पोलिस कायद्यामधील निवेदित केलेली उद्दिष्टे व कारणांचे समर्थन करत नाहीत. संख्यात्मक निर्बंधामुळे सार्वजनिक सुव्यवस्था साधली जाते हे दर्शविणारी आणि राज्याच्या दाव्याचे समर्थन करणारी कोणतीही सामग्री अभिलेखावर नाही.

१४. उत्तरवादिंची बाजू मांडताना सचिन पाटील म्हणाले की, कायद्याच्या इतिहासावरून असे दिसून येते की ऑर्केस्ट्रा बार हा डान्सबारचा एक नवीन प्रकार आहे जिथे, पूर्वी डान्स

बारमध्ये काम करणाऱ्या महिला, आता ऑर्केस्ट्रा कलाकार म्हणून सादरीकरण करतात. या ठिकाणी महिलांना अश्लील नृत्य करण्यास भाग पाडून त्यांचे शोषण केले जाते आणि ग्राहकांसोबत लैंगिक चाळे केले जातात. महिला कर्मचारी / कलाकारांच्या सुरक्षेसाठी आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी कलम १५ (३) अन्वये केवळ चार महिला असण्याची अट घालण्यात आली आहे.

१५. असा युक्तिवाद करण्यात आला की सर्व २५४ आस्थापनांमध्ये ऑर्केस्ट्रा कार्यक्रम आयोजित केले जातात आणि त्यापैकी केवळ तीन (विद्यमान अपीलकर्त्यांनी) आक्षेपार्ह अटींना आव्हान दिले आहे. या तिन्ही आस्थापनांवर अनेक फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शिवाय, या अटींना एकाही कलाकाराने किंवा कलाकारांच्या संघटनेने आव्हान दिलेले नाही, असा युक्तिवाद वकिलांनी केला.

१६. पुढे, उत्तरवादी असे सादर करतात की संबंधित अटी ह्या कलम १४ चे उल्लंघन करत नाहीत. अनुच्छेद १४ वाजवी वर्गीकरण जोपर्यंत सुबोध भिन्नतेवर आधारित आहे तोपर्यंत परवानगी देतो आणि अशा भिन्नतेचा कायद्याद्वारे किंवा कार्यकारी उपायाने साध्य करू इच्छित असलेल्या उद्देशाशी वाजवी संबंध आहे. कलम १५ (३) नुसार राज्याला महिलांसाठी विशेष तरतुदी करण्याची मुभा आहे. कलम १४ चे उल्लंघन करण्यासाठी दोन अटींची पूर्तता करावी लागते. पहिली गोष्ट म्हणजे पीडित व्यक्तीला इतरांपेक्षा आणि तत्सम व्यक्तींपेक्षा वेगळी वागणूक दिली गेली आहे; आणि दुसरं म्हणजे अशी वागणूक कुठल्याही तर्कशुद्ध आधाराशिवाय आणि

विनाकारण दिलेली आहे. सद्यस्थितीत सर्व २५४ आस्थापनांना या अटी लागू आहेत. कमी संख्येने महिलांना परवानगी देण्यात आली आहे असे येथे नाही याउलट; सर्व आस्थापनांना प्रत्येक कार्यक्रमात समान संख्येने महिलांना सहभागी करून घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. हे निर्बंध केवळ महिलांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांचे शोषण रोखण्यासाठी लागू करण्यात आलेले आहेत. असे ही  सादर करण्यात आले कि वादक हे सदरच्या कलाकारांच्या गणनेच्या बाहेर आहेत ( म्हणजेच नमूद कलाकारांच्यामध्ये ते समाविष्ट नाहीत ).

१७. उत्तरवादी  यांनी  असे प्रतिपादन केले की डब्ल्यू.पी. क्रमांक ७९३ / २०१४ मध्ये (जे इंडियन हॉटेल्स अँड रेस्टॉरंट्स असोसिएशनने दाखल केले आणि ज्याचे अपीलकर्ते सदस्य आहेत) याचिकाकर्त्या - असोसिएशनने सविस्तर विचारविनिमय करून नर्तकांच्या संख्येसंदर्भातील अटी मान्य केलेल्या होत्या. रिट याचिका (क) क्रमांक ७९३/२०१४ या प्रकरणामध्ये या  न्यायालयाच्या दिनांक ०२.०३.२०१६ च्या आदेशाचा संदर्भ येथे देण्यात आला आहे. सदरच्या आदेशाद्वारे या न्यायालयाने रंगमंचाची परिमाणे (१० फूट गुणिले  १२ फूट) ज्यावर सादरीकरण करता येईल तसेच एकूण कलाकारांची संख्या, हे सर्वकाही  मान्य केलेले आहे.

१८. असे आवाहन करण्यात आले आहे की  प्रेक्षागृहे, सभागृहे, मैदाने इत्यादी ठिकाणी सादर होणारे ऑर्केस्ट्राचे कार्यक्रम हे अपीलकर्त्यांसारख्याच्या उपहारगृह बार यासारख्या आस्थापनांमधील ऑर्केस्ट्राच्या प्रकारापेक्षा पूर्णपणे वेगळे असतात, पूर्वीच्या बाबतीत ( प्रेक्षागृहे, सभागृहे, मैदाने इत्यादी ठिकाणी सादर होणारे ) ऑर्केस्ट्राचे कार्यक्रम किंवा प्रेक्षगृहात होणारे

सादरीकरण हा तेथील एकमेव कार्यक्रम असतो आणि जनता तेथे प्रेक्षक या नात्याने (ते पाहण्यासाठीच) उपस्थित राहते. अपीलकर्त्यांप्रमाणेच हॉटेल बार आस्थापनांमध्ये ऑर्केस्ट्राचे कार्यक्रम हे केवळ तेथे दिल्या जाणाऱ्या मद्यपान सेवेला अनुषंगिक असतात. तेथे होणारे ऑर्केस्ट्रा किंवा कलापथक हे सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या सादरीकरणासारखे व्यावसायिक दर्जातूल्य नसते. ऑर्केस्ट्रासाठी सादरीकरण करणाऱ्या कलाकारांच्या नावाखाली या आस्थापनांमध्ये प्रत्यक्षात वेट्रेस (महिला वाढपी) किंवा बार - बाला यांची गरज असते. त्यांना आस्थापनेच्या आवारात ग्राहकांशी अश्लील क्रियाकलाप किंवा चाळे करण्यासाठीच ओळखले जाते किंवा त्या ग्राहकांसह तेथून निघूनही जातात. मग अशा कामातून मिळणारा नफा हा परवानाधारकांना सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणांचा वापर हा वेश्याव्यवसायासाठी पूरक असा संपर्क बिंदू म्हणून गैरवापर करण्यास प्रवृत्त करतो. मुंबईत २००९ ते मार्च २०१३ या कालावधीत भा दं वि संहितेच्या कलम २९४ अन्वये २१७ तर अनैतिक व्यापार (प्रतिबंधक ) अधिनियम ( पी आय टी ए / पीटा ) १९५६ च्या कलम ३, ४, ५ अन्वये, ९७ गुन्हे दाखल करण्यात आले.

१९. उत्तरवादी यांचे म्हणणे असे आहे की वरील अटी कलम १९(१) (जी) चे उल्लंघन करत नाहीत कारण सामान्य जनतेच्या हितासाठी अनुच्छेद १९ (६) अंतर्गत वाजवी निर्बंध लादले जाऊ शकतात. स्त्रियांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांचे शोषण रोखण्यासाठीही असे निर्बंध आवश्यक आहेत; ते वाजवी आहेत आणि भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १५ (३) द्वारे संरक्षित आहेत.

२०. प्रतिवादी राज्य यांनी कसोशीने असे म्हणणे मांडले की कर्नाटक लाइव्ह बँड रेस्टॉरंट्स असोसिएशन विरुद्ध कर्नाटक राज्य[6] या नंतरच्या निकाला संदर्भात अशा प्रकारच्या नियमांची गरज ओळखली आणि नियमांना आव्हान देण्यात आले आहे. त्यामुळे सध्याच्या अटी रास्त आहेत.

***विश्लेषण आणि निष्कर्ष***

*१. वैधानिक तरतुदी*

२१. सन १९५१ च्या अधिनियमच्या कलम २ (९) नुसार "सार्वजनिक मनोरंजनाचे जागा " खालीलप्रमाणे परिभाषित केले आहे :

> *"सार्वजनिक मनोरंजनाचे जागा " म्हणजे अशी कोणतीही जागा जिथे संगीत, गायन, नृत्य किंवा कोणतेही मनोरंजन किंवा खेळ किंवा त्यांच्या साधनांची सोय ज्यात केलेली असते आणि जेथे पैसे घेऊन किंवा प्रवेश घेतलेल्या व्यक्तींकडून पैसे गोळा करता यावेत या उद्देशाने लोकांना प्रवेश देण्यात येतो, अशी कोणतीही जागा, असा होतो व त्यात शर्यतीचे मैदान, सर्कस, नाट्यगृह, संगीत दालन, बिलियर्ड रूम, बॅगटेल रूम, व्यायामशाळा, दांडपट्ट्याची शाळा, तरण तलाव किंवा नृत्य दालन यांचा समावेश होतो.*

---

6 (२०१८) ४ एसीसीसी ३७२

सन १९५१ च्या अधिनियमच्या कलम २ (१०) मध्ये "सार्वजनिक करमणुकीची जागा" खालीलप्रमाणे परिभाषित केले आहे:

*"सार्वजनिक करमणुकीची जागा" याचा अर्थ , निवासगृह, भोजन -नि-निवासगृह किंवा निवासी हॉटेल असा होतो आणि त्यात, लोकांना कोणत्याही प्रकारची दारू किंवा मादक द्रव्य त्याच जागेत किंवा जागेजवळ सेवनासाठी पुरवण्यात येते ( अशा मदिरालय, दारूचे दुकान, बिअरचे दुकान किंवा मद्यार्क, माडी, ताडी, गांजा, भांग, अफू, याचे दुकान यासारख्या ) कोणत्याही खाद्यगृहाचा त्यात समावेश होतो.*

सन १९५१ च्या अधिनियमच्या कलम ३३ मध्ये नियम व विनीयमन करण्याचा अधिकार आहे; त्यात इतर गोष्टींबरोबरच खालीलप्रमाणे समावेश आहे .

***"कलम ३३. सार्वजनिक ठिकाण, इत्यादीमध्ये रहदारीच्या विनियमासाठी व सुव्यवस्था राखण्यासाठी नियम करण्याचा अधिकार***

**(१)** *या उपकलमात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात आयुक्तास उपरोक्त बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात या कलमाचे ( खंड (ए ), (बी ), (डी ) (डी बी ) (ई), (जी), (आर), (टी) आणि (यू)) यारवाली येणाऱ्या बाबी सोडून ) जिल्हा दंडाधिकाऱ्यास आणि या पोटकलमाच्या खंड (वाय ) धरून उपरोक्त खंडाखाली येणाऱ्या बाबींच्या संबंधात पोलीस अधीक्षकास ) त्यांच्या*

*प्रभारावालील क्षेत्रात किंवा त्यांच्या कोणत्याही भागात पुढील गोष्टींच्या संबंधात या अधिनियमाशी विसंगत नसतील असे नियम किंवा आदेश करता येतील त्यात फेरफार करता येतील किंवा ते खंडित करता येतील. ......*

***(डब्लु) (i)*** *सार्वजनिक मनोरंजनाच्या जागेला किंवा सार्वजनिक करमणुकीच्या जागेला लायसन्स देणे किंवा त्यावर नियंत्रण ठेवणे; (ii) त्या परिसरात राहणाऱ्या किंवा तेथून ये - जा करणाऱ्या लोकांस अडथळ्यांचे, गैरसोयीचे] उपद्रवाचे, जोखमीचे, धोक्याचे किंवा नुकसानीचे ठरू नये म्हणून सार्वजनिक मनोरंजनाची जागा किंवा सार्वजनिक कारमुनिकीच्या किंवा संमेलनाच्या जागा चालवण्यास मनाई करणे;*

(डब्लयूए) (*i*) *सार्वजनिक सुव्यवस्थेच्या किंवा नैतिकतेच्या हितासाठी किंवा निर्दिष्ट केलेले अपवाद वगळता सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी, मेळावे आणि तमाशासह सार्वजनिक करमणुकीसाठी संगीत, नृत्य, नकला किंवा नाट्य किंवा इतर सादरीकरणांना परवाना देणे किंवा नियंत्रित करणे;*

(*ii*) *सार्वजनिक सुव्यवस्था, शालीनता किंवा नैतिकतेच्या हितासाठी किंवा सर्वसामान्यांच्या हितासाठी, कलाकारांच्या रोजगारासाठी आणि अशा सादरीकरणात कलाकार आणि प्रेक्षकांच्या वर्तनाचे नियमन करणे;*

अधिनियम, १९५१ चे कलम ३३ (१) (२), नियम बनविणे, बदलणे किंवा ते रद्द करणे याबाबतीत आहे ; इतर *गोष्टींबरोबरच त्यात खालील प्रमाणे नमूद केले* आहे :

*"कलम ३३ (१)...*

(२) (१) *पोट- कलम* (१) *च्या खंड* (क), (ख) *व* (ग) *अन्वये नियम करण्याचे, त्यात फेरफार करण्याचे किंवा ते विखंडित करण्याचे अधिकार राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीन असतील.*

(२) *पोट-कलम* (१) *च्या उरलेल्या खंडांमधील नियम करण्याचा, त्यात फेरफार करण्याचा किंवा ते विखंडित करण्याचा अधिकार त्या शासनाच्या पूर्वमंजुरीच्या अधीन असेल.*

२२. नियम बनविण्याचा, बदलण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार (कलम ३३(२) अन्वये) संबंधित परिसरातील मागील प्रकाशनाच्या कलम ३३ (६) मधील अटींद्वारे मर्यादित आहे. कलम १६२ (१) नुसार ते परवाने लागू केले जातात आणि लेखी परवानग्यांमध्ये अटी वगैरे नमूद कराव्या लागतात; कलम १६२ (२) नुसार परवाने किंवा लेखी परवानग्या रद्द करता येतात.

२३. सदर परिसराच्या कामकाजासाठी आवश्यक परवाने देण्याची पूर्वअट म्हणून अर्जदारांना अनेक अटींची पूर्तता करावी लागते, जसे की[7],

(i) जागेच्या परवान्यासाठी कोणत्याही अर्जासोबत, इतर गोष्टींबरोबरच कोणत्याही धार्मिक, शैक्षणिक संस्था किंवा रुग्णालयापासून स्थळाचे अंतर दर्शविणारा स्थलदर्शक आराखडा (साइट प्लॅन) असेल.

7 १९६० चे नियम १०८, १०९ आणि १२०

(ii) प्रस्तावित करमणुकीचे ठिकाण आणि धार्मिक स्थळ किंवा रुग्णालय किंवा शैक्षणिक संस्था यांच्यातील अंतर ७५ मीटरपेक्षा जास्त असेल.

(iii) करमणुकीचे प्रस्तावित ठिकाण दाटीवाटीच्या आणि दाट लोकवस्तीच्या भागात नसावे.

(iv) प्रस्तावित जागा १० मीटरपेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यावर असली पाहिजे.

(v) प्रस्तावित करमणुकीच्या ठिकाणच्या मालकांना/ भागीदारांना समाजविघातक किंवा अशा कोणत्याही कृत्यांसाठी अटक किंवा ताब्यात घेतलेले नसावे किंवा अशा कोणत्याही गुन्ह्यासाठी दोषी ठरविलेले नसावे.

(vi) व्हिडिओ पार्लरमध्ये बसविण्यात येणाऱ्या दोन मशिनमधील अंतर आराखड्यात प्रतिबिंबित होईल.

(vii) ७५ मीटरच्या परिघात सार्वजनिक करमणुकीचे असे कोणतेही ठिकाण अस्तित्वात नाही.

(viii) परवाना देण्यात आलेल्या पूर्ण कालावधीत परवान्यात नमूद केलेल्या अटींचे पालन केले जाईल आणि कोणत्याही एका अटींचे उल्लंघन झाल्यास, नेहमीच्या प्रक्रियेचे पालन करून परवाना रद्द केला जाण्याची शक्यता आहे.

२४. वरील तरतुदी महिलांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करणाऱ्या नियमांना पूरक आहेत. मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मधील तरतुदी आणि विशेषत: कलम ३३ (१) (डब्ल्यू) परवाना प्राधिकरणाला नियम तयार करण्याचा अधिकार देतात.

२५. करमणूक नियम, १९६० च्या नियम १२२ आणि १२३ मध्येही कार्यक्रम आयोजित करण्यासाठी प्रतिबंधात्मक अटी विहित करण्यात आल्या आहेत. या निर्बंधांमध्ये भाषेची निंदा किंवा गैरवापर; पेहराव, नृत्य, हालचाल किंवा हावभाव यांतील कोणतीही अश्लीलता यांचा समावेश आहे; सादरीकरणाच्या परवान्या अंतर्गतसुद्धा अशाच अटी आणि निर्बंध विहित करण्यात आले आहेत; कोणतेही प्रदर्शन किंवा जाहिरात मग ती (भित्तीपत्रक) पोस्टर्सच्या माध्यमातून असो किंवा वर्तमानपत्रात, नग्न किंवा अपुरे कपडे परिधान केलेल्या स्त्रियांची छायाचित्रे; हेतूसाठी दिलेल्या जागेव्यतिरिक्त इतर ठिकाणी कोणतेही प्रदर्शन; कॅब्रे कलाकारांचे प्रेक्षकांशी कोणत्याही प्रकारचे मिसळणे किंवा प्रेक्षकांतील कोणत्याही सदस्याशी स्पर्शाने किंवा अन्यथा कोणताही शारीरिक संपर्क.

II. मागील खटला

